Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 250 – 255
DOI: 10.5281/zenodo.10119280

**Original Research Article**

# राष्ट्रीय विकासात महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांची गरज

प्रा. डॉ. दामाजीवाले एम. डी.

विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमद्पुर जि. लातूर ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: damajiwalemadhav8201@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात इ.सन 1920 ते इ. सन 1947 हा कालखंड गांधी युग म्हणून ओळखला जातो. खऱ्या अर्थाने ते राजकीय विचारवंत किंवा लढावय्या नव्हते. तर ते धार्मिक, मानवतावादी, कर्मयोगी, तत्वनिष्ठ मानव होते. पण परिस्थितीने त्यांना राजकीय आंदोलनात ओढले गेले. 1915 मध्ये दक्षिण आफ्रिकेतून परत भारतात आल्यानंतर तत्कालीन परिस्थितीतून भारतीय राजकारणात आले. त्यांचे संपूर्ण जीवन त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी अर्पण केले. भारतीय राजकारणाला त्याने एक नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. आपले विचार प्रत्यक्षात उतरविण्याचा व आपल्या विचारांची भुरळ जनतेला घालण्याची जादुई ताकद महात्मा गांधीजींच्या विचारात. महात्मा गांधीजींचे धार्मिक, आर्थिक, राजकीय विचार परिवर्तनकारी होते. त्यातील आर्थिक विचारांचा एक भाग म्हणजे महात्मा गांधीजींचे सर्वोदयवादी विचार होय. महात्मा गांधीजींनी धर्म, सत्य, अहिंसा, सत्याग्रह, शिक्षण, वर्ण, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, विश्वस्त वृत्ती, स्त्रियांचे प्रश्न या संबंधीचे विचार प्रकट केले ते उदात्त आहेत की, त्या सर्वांची अंमलबजावणी केली तर राष्ट्रीय विकास होऊन स्वर्ग अवतरल्याशिवाय राहणार नाही.सर्वोदयवादी विचारांची जर अंमलबजावणी झाली तर किंवा तिचे पालन केले तर प्रत्येक माणसात निस्वार्थ भावना निर्माण होऊन तो सर्वस्वाचा त्याग केल्याशिवाय राहणार नाही. या त्याग भावनेतून राष्ट्राच्या विकासाला चालना मिळेल.

सर्वोदय हा विचार शब्द प्रथम 1908 मध्ये वापरात आणला. सर्वांची उन्नती म्हणजे सर्वोदय होय. महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांवर जॉन रस्किन ने लिहिलेल्या 'Un to the last' 'अन टू द लास्ट' या ग्रंथातील विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 'या ग्रंथातील नीतीशास्त्राचे प्रभुत्व समाजातील सर्व व्यवहारांवर असावे. अर्थरचनेतील न्याय अन्यायाचा विचार झाला पाहिजे. अर्थशास्त्र ही ध्येयवादी नैतिक असले पाहिजे. मनुष्याच्या अर्थ प्रेरणा व काम प्रेरणा, कर्तव्य व प्रेम यांच्या बंधनात ठेवल्या पाहिजे. याला समाज धारणेचे परमार्थिक तत्त्वज्ञान म्हणता

येईल व त्यांच्या आधारे परमार्थिक अर्थशास्त्र निर्माण करता येईल. परमार्थिक अर्थशास्त्र स्वीकारल्याशिवाय मानवाला तरणोपाय नाही.' असे रस्किनचे विचार होते.[1] या विचारातूनच महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांचा उदय झाला. प्रस्तुत लघु शोधनिबंधातून महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचाराची राष्ट्र विकासासाठी गरजेचे आहे. अशी मांडणी केली आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत लघुशोधनिबंध लिहिण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. उपलब्ध संदर्भ साधन ग्रंथांचा आधार घेऊन शास्त्रीय पद्धतीने महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांची राष्ट्रीय विकासासाठी असलेल्या गरजेची मांडणी केली आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

राष्ट्रीय विकासात सर्वोदयवादी विचाराची गरज आहे. महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारातील समाजव्यवस्थेतील सर्व घटकांचा विकास करून विषमता नष्ट करणे, यासाठी त्यागाची गरज म्हणजे जे आपल्याजवळ आहे त्याचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठी करणे, सर्वांच्या कल्याणातच माझे कल्याण आहे. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख हा सर्वोदयवादी विचारांचा मूळ गाभा आहे. सर्वांचा विकास, सर्वांचे कल्याण म्हणजे राष्ट्राचा विकास, राष्ट्राचे कल्याण यातच माझे ही कल्याण आहे. ही भावना निर्माण करणे आजही राष्ट्रीय शासनाने विकासाचे धोरण आखले आहे. त्यात महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांचा अवलंब केलेला दिसून येतो.

**सर्वोदय म्हणजे काय**

सर्वोदय म्हणजे 'सर्व आणि उदय' या शब्दाचा बनला आहे. ज्याचा अर्थ सर्वांचा उदय किंवा विकास असा होतो. समाजातील सर्वात शेवटचा घटक जो विकासापासून वंचित आहे. अंत्य म्हणजे शेवटचा आहे. म्हणजे विकासापासून किंवा प्रगतीपासून शेवटी असलेला घटक हा सर्वोदयाच्या केंद्रस्थानी मानून त्याचा विकास करणे ही सर्वोदयवादी विचारसरणी होय. महात्मा गांधीजींनी सर्वोदयाला व्यापक अर्थ व आशय निर्माण करून दिला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या जोडीला स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजाच्या पुनर्निर्माणाची कल्पना महात्मा गांधीजींच्या डोक्यात आकार घेत होती व त्यातून सर्वोदयाचा विचार पुढे आला. नैतिक अधिष्ठान व सर्वांची भूमिती ही या विचारसरणीची दोन प्रमुख आधार तत्वे आहेत. सर्वोदयी विचाराला महात्मा गांधींनी अध्यात्मिक संदर्भ जोडला आहे. 'सर्व' याचा अर्थ 'ईश्वर' सर्वव्यापी आहे. सर्वजण ईश्वराची लेकरे आहेत. म्हणून गांधीजी म्हणतात की, जे माझे आहे ते ईश्वराचे आहे, जे ईश्वराचे आहे ते सर्वांचे आहे.[2] सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय, प्रगती, सर्वांचे कल्याण, समाजाचा कोणताच घटक प्रगतीपासून वंचित राहणार नाही. शेवटच्या घटकांचाही विकास किंवा कल्याण गृहीत धरले होते. जॉन रस्किनच्या 'Un to the last' 'अन टू द लास्ट' या ग्रंथाचा अर्थ 'पहिल्या इतकाच शेवटचा ही चिता' असा आहे. सर्व मानव जातीच्या कल्याणाची कल्पना असा विचार गांधींनी सर्वोदयवादी विचारातून मांडली आहे.

**सर्वोदयवादी तत्त्वे**

महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेल्या सर्वोदयवादी विचारांची तत्त्वे थोडक्यात पुढील प्रमाणे होते.

१. सर्वोदयाचा भर सर्व व्यक्तीच्या उन्नतीवर असून समाजातील प्रत्येक व्यक्तीचे कल्याण साधने.

२. व्यक्ती व्यक्ती मधील स्वत्वाची भावना नष्ट करून समाज हिताची भावना जागृत करण्यावर सर्वोदयाचा भर आहे.
३. सर्वोदय विचारसरणी ही एका देशापूरती मर्यादित नसून विश्व व्यापक आहे.
४. सर्वोदयाचा भर साधन सूचीतेवर आहे.
५. सर्वोदय विचारात भेदभाव नाहीत. शोषण रहित समाज व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला आहे
६. सर्वोदय आर्थिक व राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणावर घर देतो. उत्पन्नाच्या सर्व साधनाचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे तसेच सत्तेचेही विकेंद्रीकरण झाले पाहिजे.[3]
७. सर्वोदय समाजातत स्वातंत्र्य असले पाहिजे.
८. समाजातील उच्च- नीच, समर्थ-असमर्थ, मंदबुद्धी मागास अशा सर्वांचा अभ्युदय सर्वोदयामध्ये अभिप्रेत आहे.

'जगा आणि जगू द्या' या विचारापेक्षाही इतरासाठी जगा Not me but you या उच्च विचारांचा व्यवहारात अवलंब करणे हा सर्वोदयात समन्वयाचा विचार सर्वात महत्त्वाचा आहे. सर्व विचारांचा मेळ घालण्याची व त्यांना एकत्र आणण्याची शक्ती महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी तत्त्वज्ञानात आहे. आधी सर्वांचा उत्कर्ष व्हावा, त्यातच माझा ही उत्कर्ष आहे अशी भावना, वृत्ती असणे आवश्यक आहे. 18 जानेवारी 1948 च्या 'हरिजन' च्या अंकात महात्मा गांधीनी सर्वोदयाची रूपरेषा स्पष्ट करताना सांगितले की, 'खऱ्या भारताचे लोकशाहीचे स्वप्न जर साकार व्हायचे असेल तर खऱ्या भारतातल्या सामान्यातल्या सामान्य माणसालाही आपण भारताचे शासक आहोत असे वाटले पाहिजे. केवळ मूठभर बड्या लोकांना आपण शासन करते आहोत असे वाटता कामा नये.'[4] महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारसरणीत सामान्य श्रमिक, मजूर आणि धनी, उद्योगपती या दोन्ही घटकांमध्ये समानता पाहिजे. प्रत्येकाने घाम गाळून आपली उपजीविका करावी. महात्मा गांधींनी समाजातील आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी जे धनिक लोक आहेत त्यांचे मन वळवून त्यांच्या संपत्तीचा विनियोग समाजात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी करावा. या मार्गाने महात्मा गांधीजींच्या विचारावर नंतरच्या काळात थोर गांधीवादी नेते विनोबा भावे यांनी 'भूदान चळवळ' चालवली.[5] त्यांनी महात्मा गांधीजी सर्वोदयवादी विचारांची दुर्बलांना सबल बनविण्यासाठी खरी गरज असल्याचे भूदान चळवळीतून दाखवून दिले.

**महात्मा गांधीजींच्या सर्वोदयवादी विचारांचे स्वरूप**

महात्मा गांधीजींची सर्वोदयवादी विचारसरणी ही आधुनिक काळात अत्यंत महत्त्वाची वाटते. जॉन रस्किनच्या 'Un to the last' या ग्रंथाचे गुजराती भाषेत त्यांनी भाषांतर केले. पुस्तकाच्या नावामध्ये विशिष्ट असा अर्थ आहे. येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना प्रसाद देताना म्हणाले हा शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवा. म्हणजेच मानवी जीवनाच्या फायद्यापासून कोणीही वंचित राहू नये असा विचार 'Un to the last' या पुस्तकातून जॉन रस्किनने मांडला. महात्मा गांधींनी त्याला 'सर्वोदय' असे नाव दिले. सर्वोदयाची व्याख्या करताना गांधींनी 'अहिंसक मार्गाने सर्वांचे कल्याण साधणारी चळवळ म्हणजे सर्वोदय' अशी केली.

सर्वोदय ही एक अशा प्रकारची विचारसरणी आहे की, ज्याद्वारे सर्वांचा उदय करणारी समाजरचना निर्माण व्हावी. समाजवादी समाजाची नव्याने रचना करणे गांधींना अभिप्रेत होते. ज्या रचनेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहार आदर्श पातळीवरून केले जावे. सर्वोदय ही अशी परिवर्तनवादी विचारसरणी आहे की, ज्यामध्ये व्यक्ती, समाज,

राजकारण, अर्थव्यवस्था यांच्यात समानता यावी, व्यक्तिगत पातळीवरील द्वेष, भेदभाव, स्पर्धा व संघर्ष या भावना नष्ट करणे हे सर्वोदयात अभिप्रेत आहे. सर्वोदयवादी समाज रचनेत माणसातील सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करून एकता व सहकार्य या तत्त्वावर समाजाची रचना गांधींना अभिप्रेत होती. म्हणूनच गांधीजींनी जातीभेदाला विरोध केला. वर्णभेद, स्त्री-पुरुष विषमता या गोष्टींना सर्वोदयात स्थान नव्हते. 'समाजातील सर्व प्रकारचे भेद नष्ट करून समतेवर आधारित नव समाज निर्माण करणे हीच खऱ्या अर्थाने सर्वांच्या उन्नतीची खात्री असल्याने त्याची निर्मिती हेच सर्वोदय वादाचे उद्दिष्ट आहे.'[6]

सर्वोदयवादी समाज व्यवस्थेत कोणत्याही प्रकारच्या शोषणाला स्थान नाही सर्वोदयवादी समाज परस्पर सहकार्य या तत्त्वावर आधारित असल्याने शोषणामुळे मानवाचा सर्वांगीण विकास उन्नती होऊ शकत नाही सर्वोदयवादी विचारसरणी भौतिकवादी सुखाला महत्त्व देणारी नसून मानवाच्या नैतिक व आत्मिक उन्नतीला महत्त्व देणारी आहेत. सर्वोदयवादी समाज व्यवस्था ही नैतिकतेच्या आधारावर झाली तरच माणसा-माणसातील व्यवहार उचित व आदर्श होऊन सर्वांची उन्नती होईल. सर्वोदय ही सामाजिक पुनर्रचनेची विचारसरणी असून नैतिकता हेच या समाज व्यवस्थेचे मूलभूत अधिष्ठान आहे. स्वयंपूर्ण व स्वावलंबी ग्रामीण जीवनाला सर्वोदय समाज रचनेत महत्त्वाचे स्थान दिले कारण यामुळे सर्वांचा सर्वच क्षेत्रात विकास करून घेणे. स्वयंरोजगार निर्माण होईल. म्हणून चरखा आणि खादीचा गांधीजींनी पुरस्कार केला. आर्थिक स्वातंत्र्य व समतेच्या विचारातून खरी लोकशाही प्रस्थापित होईल.[7] यासाठी गांधीजींनी आर्थिक विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला. तरच जनतेचे शोषण थांबेल व तिचे सर्वांगीण कल्याण होईल अशी महात्मा गांधीजींची तळमळ होती. कारण गांधीजींच्या अगोदर जो क्रांती विचार जगात मांडला गेला तो बहुशी आर्थिक भौतिक परिवर्तनावरच भर देणारा होता. ही मानसिकता बदलण्यावर गांधींनी भर दिला. अमुलाग्र परिवर्तनासाठी केवळ परिस्थिती नव्हे तर माणूसच बदलण्याची गरज त्यांना भासत होती. म्हणून त्याला अध्यात्माची जोड दिली. समाजाचा अध्यात्मिक विकास वाद मांडून व्यक्तीप्रमाणे समाजाची ही सामाजिक व राजकीय प्रगती होत असते असे सर्वोदयात गृहीत धरले आहे.[८]

महात्मा गांधींनी सर्वोदय समाज व्यवस्थेत आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी अतिरिक्त यांत्रिकीकरण, शहरीकरण, व्यापक राष्ट्रीयकरण आणि भांडवलशाही यांना विरोध करून वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात श्रमशक्तीला वाव मिळवून देण्यासाठी ग्रामोद्योग व कुटीर उद्योग याला प्राधान्य दिले. म्हणजेच अर्थसत्तेचे विकेंद्रीकरण करून समाजातील सर्व घटकांच्या उन्नतीला प्रोत्साहन दिले. स्वदेशी वर अधिक भर दिला. अर्थव्यवस्थेतील स्पर्धा टाळणे त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या टाळणे शक्य होते. स्वार्थी स्पर्धेमुळे समाज हिंसक बनतो. याची जाणीव असल्याने त्यांनी अहिंसक सर्वोदय समाज निर्मिक अपेक्षा केली. समाजातील सर्व वर्गाचा गरिबापासून समाजातील वंचित घटकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, ज्ञान, मनोरंजन व आरोग्य संवर्धन या मूलभूत गरजा भागून त्यांचा भौतिक विकास व्हावा.[९] यासाठी समाजाचा अध्यात्मिक व नैतिक विकास होणे गरजेचे होते. श्रीमंतांचा अध्यात्मिक व नैतिक विकास न होण्यास त्यांच्याकडे असलेली अतिरिक्त संपत्तीच कारणीभूत आहे. म्हणून त्यांचा अध्यात्मिक विकास होण्यासाठी त्यांनी आपल्या जवळील अधिकच्या संपत्तीचा त्याग केला पाहिजे व ती संपत्ती गरिबांच्या म्हणजे शेवटच्या घटकांच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे असा महात्मा गांधीजींचा सर्वोदयवादी विचार होता.

**सारांश**

महात्मा गांधीजींची सर्वोदयवादी विचारसरणी सुरुवातीपासून शेवटच्या घटकापर्यंत सर्वांगीण विकास व्हावा अशी होती. त्यात कोणतीही विषमता नव्हती. भेदभाव, स्वार्थ यांना वाव नव्हता. सर्वोदयवादी ही महात्मा गांधीजी प्रणित समाजवादी विचारसरणी असल्याचे दिसून येते त्यात व्यक्ती विकास असला तरी ती व्यक्तिवादी नाही. त्यामध्ये समाजाच्या विकासावर अधिक भर दिला आहे. सर्वोदय ही भौतिक व्यवस्थेला नैतिक अधिष्ठान देणारी विचारसरणी आहे. सर्वोदय हा जनतेचा समाजवाद आहे. त्यामध्ये गरीब, श्रीमंत सर्व वर्गाचे कल्याण अपेक्षित आहे. सर्वोदयवादी विचारसरणीनुसार ग्राम जीवन हा भारताचा आत्मा असल्यामुळे या देशाचा कोणताही सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार खेडे हा केंद्रबिंदू मानूनच झाला पाहिजे. 'खेड्यांचे राष्ट्रकुल' असे स्वतंत्र भारताबद्दल चे चित्र महात्मा गांधींनी रेखाटले होते. या व्यवस्थेत प्रत्येक खेडे आपल्या प्रशासनासाठी व गरजांच्या पूर्तीसाठी एक स्वायत्त एकक असेल असे गृहीत धरण्यात आले. म्हणजे राष्ट्रातील शेवटच्या घटकांचा म्हणजेच खेड्यांचा विकास, प्रगती म्हणजेच राष्ट्राचा विकास होय. हेच महात्मा गांधीजींना सर्वोदयवादी विचारसरणीत अभिप्रेत होते. आजही भारतात शेवटच्या घटकांच्या विकासावर भर दिला जातो. यासाठी सरकारी पातळीवर विविध प्रकारचे धोरणे तयार करून त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

**संदर्भ सूची**


१. डोळे ना.य., राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, (दु.आ.), 2009, पृ. 837.

२. काचोळे दा. धो., भारतीय सामाजिक विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 1999, पृ. 259.

३. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2003, पृ. 449.

४. गाठाळ साहेबराव, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,1999, पृ. 238.

५. नारायण इकबाल, भारतीय राजनीतिक विचारक, ग्रंथ विकास प्रकाशन, जयपुर, 2001, पृ. 139.

६. नांदेडकर व. गो., राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2011, पृ. 302.

७. कुलकर्णी अ. ना., आधुनिक राजकीय विचारप्रणाली, विद्या प्रकाशन, नागपूर, 2004, पृ. 146.

८. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, पूर्वोक्त. पृ. 444.

९. कुलकर्णी अ. ना., पूर्वोक्त. पृ. 148.